08 MAR 2021 | लोकमत | जनसंपर्क कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उच्चशिक्षणात सावित्रीच्या लेकींनी घेतली आघाडी

## कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील चित्र : पाच वर्षांत १ लाख ३७ हजार पदवीधर

संतोष मिठारी
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जन्मदरात मुलांशी बरोबरी करता आली नाही, म्हणून काय झाले, शिक्षण घेण्याच्या मिळालेल्या संधीचे सोने करत पदवीधर होण्यामध्ये मुलांपेक्षा आपणच आघाडीवर असल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील 'सावित्रीच्या लेकींनी' दाखवून दिले आहे. गेल्या पाच वर्षांत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील १ लाख ३७ हजार मुली पदवीधर झाल्या आहेत. पदवीधर मुलांची संख्या १ लाख २३ हजार ६१० इतकी आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली जिल्ह्यात जन्मदरात सध्या एक हजार मुलांमागे १०२७ मुली आहेत. पण, कोल्हापूरमध्ये एक हजार मुलांमागे ९२७ मुली, साताऱ्यामध्ये ९४० मुली असे प्रमाण आहे. या दोन्ही जिल्ह्यांमध्ये जन्मदरात मुलींना अद्याप मुलांशी बरोबरी साधता आलेली नाही. मात्र, अभ्यासातील सातत्य, जिद्द आणि कष्टाच्या जोरावर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील या तिन्ही जिल्ह्यांमधील मुली शिक्षणामध्ये आघाडीवर आहेत. दहावी, बारावी, पदवीधर शिक्षण घेण्यासह त्यामध्ये उत्तीर्णतेचे त्यांचे प्रमाण वर्षागणिक वाढत आहे. विज्ञान-तंत्रज्ञान, पारंपरिक अभ्यासक्रमापासून ते पदविका अभ्यासक्रमांपर्यंत आणि पदवीधर होण्यात मुलांच्या तुलनेत मुलींचा टक्का वाढला आहे. विज्ञान, वाणिज्य, संगणकशास्त्र, फार्मसी, शिक्षणशास्त्र, मानव्यविद्या आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमामध्ये पदवीधर होण्यात मुली आघाडीवर आहेत. तंत्रज्ञान विद्याशाखेत त्या मुलांपेक्षा थोड्या मागे आहेत. बदलत्या काळानुसार पाऊले टाकत रोजगाराभिमुख शिक्षण घेण्याकडे मुलींचा कल वाढला आहे.

### गेल्या पाच वर्षांतील पदवीधरांची आकडेवारी




### ३२३ जणी संशोधन क्षेत्रात

विद्यापीठातील विविध विभाग आणि संलग्नित २९३ महाविद्यालयांमध्ये संशोधन क्षेत्रात सध्या ३२३ विद्यार्थिनी कार्यरत आहेत. त्यातील २४१ जणी पीएच.डी., तर ८२ जणी एम.फिल्. करत आहेत. पीएच.डी. आणि एम.फिल्. करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४४० इतकी आहे.

### शिवाजी विद्यापीठात उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी, विद्यार्थिनी

| विद्याशाखा | विद्यार्थी | विद्यार्थिनी |
|---|---|---|
| कला, सामाजिकशास्त्रे | ३९६३२ | ३५७२६ |
| वाणिज्य | २३९७७ | ३६४०० |
| विज्ञान | २५३३१ | २८४३९ |
| तंत्रज्ञान | ३०४०८ | १५०६६ |
| संगणकशास्त्र | ३९६४ | ४९५३ |
| व्यवस्थापन | ३३४१ | ३१३४ |
| फार्मसी | ३०७८ | ३७११ |
| लॉ | १६३८ | १५१८ |
| शिक्षणशास्त्र | १३४६ | ३०२७ |
| पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रम | १०३१ | १०५७ |

### शिक्षणाला बळ

उच्च शिक्षणाबाबतची वाढलेली जागृती, शैक्षणिक शुल्कातील सवलत, आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींसाठी बस पास योजना, आदींमुळे उच्च शिक्षणातील मुलींच्या शिक्षणाला बळ मिळण्यासह त्यांचा टक्का वाढत आहे.

उच्च शिक्षणात मुलींचे वाढलेले प्रमाण स्वागतार्ह आहे. मात्र, त्यांनी केवळ पदवी घेऊन थांबू नये, तर वर्किंग फोर्समध्ये यावे. त्यासाठी त्यांना कुटुंबीय आणि समाजाने पाठबळ द्यावे. पोषक वातावरण तयार करावे.

- रसिया पडळकर, सहायक प्राध्यापक, कोल्हापूर.


समाजाची सकारात्मक मानसिकता मुलींच्या प्रगतीला कारणीभूत ठरत आहे. मिळालेल्या संधीचा मुलींनी चांगला उपयोग करून शिक्षणात आघाडी घेतली आहे. जन्मदर वाढीचे असलेले सध्याचे सांगलीतील चित्र भविष्यातही कायम राहावे.

- अश्विनी पोटे, समन्वयक, अवनी संस्था सांगली.


शिक्षणात वाढता टक्का असण्याचे 'चांगलं स्थळं' मिळवणे हे एक कारण दिसते. शिक्षणाद्वारे ज्ञान मिळवून स्वावलंबी होण्याकडे मुलींनी अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. करिअरमध्ये मुलींची संख्या अद्यापही कमी आहे.

- ॲड. व्ही. एस. चैत्रा, लेक लाडकी अभियानातील कार्यकर्त्या, सातारा.

### बारावीतील उत्तीर्णतेची टक्केवारी




### दहावी उत्तीर्णतेची टक्केवारी



सकाळ

# शिवाजी विद्यापीठाची अधिसभा गुरुवारी

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाची अधिसभा बुधवारी (ता.१०) शिवाजी विद्यापीठात होणार आहे. येथील राजर्षी शाहू सभागृहात ही सभा होईल. या अधिसभेत ५१० कोटींच्या अंदाजपत्रकाचे सादरीकरण होणार आहे. तसेच कोरोनाकाळात विद्यार्थी, शिक्षक यांच्यासाठी राबवण्यात आलेल्या योजनांवरही यामध्ये चर्चा होईल. कोरोनाच्या काळात विद्यापीठाने जे निर्णय घेतले त्याबद्दलही सदस्य आपली भूमिका मांडतील. गेल्या अधिसभेमध्ये विद्यापीठ प्रशासन आणि सदस्य यांच्यात वाद झाले होते. त्यातून सदस्यांनी सभात्याग केला होता. या पार्श्वभूमीवर या अधिसभेत सदस्य कोणती भूमिका घेतात, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

सकाळ

# महाविद्यालये घेणार प्रॅक्टिकल परीक्षा

## बीएस्सी, एमएस्सी प्रॅक्टिकल पुढील सेमिस्टरमध्ये

कोल्हापूर, ता.७ : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा २२ मार्चपासून होत आहेत. यासाठीच्या प्रॅक्टिकल परीक्षा महाविद्यालयांनी घ्यायचा आहेत; मात्र बीएस्सी आणि एमएस्सीच्या विद्यार्थ्यांची प्रॅक्टिकल परीक्षा पुढील सेमिस्टरमध्ये होईल, अशी माहिती परीक्षा विभागाचे संचालक गजानन पळसे यांनी दिली.

कोरोनामुळे यंदा विद्यापीठाने नेहमीचे वेळापत्रक कोलमडले. त्यामुळे हिवाळी सत्रातील परीक्षा यंदा २२ मार्चपासून सुरू होणार आहेत. विज्ञान, फार्मसी, इंजिनिअरिंग यांना प्रॅक्टिकल परीक्षा असते, तर बी.ए व व्यवस्थापन शास्त्र तसेच अन्य विभागांना प्रकल्प (प्रोजेक्ट) सादर करायचे असतात. या प्रकल्पांचे सादरीकरण महाविद्यालयीन स्तरावरच होणार आहे. तसेच फार्मसी, इंजिनिरिंग यांची प्रात्यक्षिकेही महाविद्यालय स्तरावरच होतील.

बीएस्सी आणि एमएस्सीसाठी असणारी प्रात्यक्षिक परीक्षा ही वार्षिक असल्याने ती या सत्रात होणार नसून ती पुढील सत्रात होणार आहे. काही दिवसांपासून विद्यार्थ्यांमध्ये याबाबत गोंधळ होता, मात्र विद्यापीठाने याबाबतची माहिती देऊन हा संभ्रम दूर केला आहे.

0 8 MAR 2021
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा महाविद्यालयांमध्ये होणार

## शिवाजी विद्यापीठ : हिवाळी सत्रातील परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाने ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० या हिवाळी सत्रातील लेखी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. या परीक्षांचा प्रारंभ दि. २२ मार्चपासून होणार आहे. एका दिवसातील चार विविध सत्रांमध्ये परीक्षा होतील. एम.बी.ए., एम.कॉम., अशा ज्या अभ्यासक्रमांचे प्रकल्प, प्रात्यक्षिके आणि तोंडी परीक्षा आहेत, या परीक्षा महाविद्यालय पातळीवर होणार आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा घेण्याबाबत विद्यापीठाने स्थापन केलेल्या गुळवणी समितीच्या शिफारसीनुसार विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने शनिवारी हिवाळी सत्रातील लेखी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले. या वेळापत्रकानुसार बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बीबीए., बीसीए., बीएसडब्ल्यू., बी.व्होक., बॅचलर ऑफ इंटेरियर डिझाईनिंग, फूड टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, डिझाईन, ड्रेस मेकिंग अँड फॅशन-को ऑर्डिनेशन, अशा विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ३२४ परीक्षा होणार आहेत. दूरशिक्षण पध्दतीने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा संबंधित अभ्यास केंद्र असलेल्या महाविद्यालयांवर होईल. जे विद्यार्थी संयुक्त परीक्षेला (वेगवेगळ्या भागांत एकत्रित किंवा वेगवेगळ्या सत्रांत एकत्रित) बसणार आहेत, त्यांचे निकाल नियमित विद्यार्थ्यांचे निकाल लागल्यानंतर जाहीर करण्यात येणार आहेत. या सत्रातील पदवी प्रथमवर्ष (प्रथम, द्वितीय सत्र) आणि पदव्युत्तर प्रथम वर्ष (प्रथम) परीक्षांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर केले जाणार असल्याची माहिती परीक्षा मंडळाकडून देण्यात आली आहे.

### अशी होणार परीक्षा

- एक तासाची ५० गुणांची बहुपर्यायी (एमसीक्यू)
- ऑनलाईन अथवा ऑफलाईन स्वरूप
- २५ प्रश्न असून प्रत्येकी दोन गुण

एका दिवसात चार सत्र असतील

- सकाळी १०.३० ते ११.३०, दुपारी १२.३० ते १.३०
- दुपारी २.३० ते ३.३०, दुपारी ४.३० ते सायंकाळी ५.३०

बी.एस्सी., एम.एस्सी अशा वार्षिक अभ्यासक्रमांची प्रात्यक्षिके आता होणार नाहीत. मात्र, एमबीए, एम.कॉम, अशा ज्या अभ्यासक्रमांना प्रोजेक्ट, प्रॅक्टिकल, तोंडी परीक्षा आहेत, त्या लेखी परीक्षा सुरू होण्यापूर्वी महाविद्यालयांमध्ये होतील. तसे सांगण्यात येईल.

- गजानन पळसे,
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ.

पुण्यनगरी

# कौशल्याच्या बळावर स्वतःचा रस्ता तयार करा : ए. एम. गुरव

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

केवळ पदवीच्या बळावर नोकरी मिळवता येत नाही. त्यासाठी कौशल्ये आत्मसात करावी लागतात. काळानुसार कौशल्य बदला, इतरांपेक्षा वेगळे काहीतरी करा, स्वतःच स्वतःचा रस्ता तयार करा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील कॉमर्स व मॅनेजमेंट विभागाचे प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले.

येथील ओंकार कॉलेजमध्ये माजी विद्यार्थी संघटना व कौशल्य विकास कक्षाच्या वतीने आयोजित 'कौशल्य विकास आणि रोजगार व स्वयंरोजगार संधी' या विषयावर आयोजित राज्यस्तरीय ऑनलाईन वेबिनारमध्ये प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण होते. गुरव म्हणाले, हार्ड आणि सॉफ्ट स्कील अशी दोन प्रकारची कौशल्ये असतात. जीवनात यशस्वी होण्यासाठी ही दोन्ही कौशल्ये महत्त्वाची असतात. म्हणून स्वतःला यशाचा पासवर्ड करायचा असेल, तर एकापेक्षा जास्त कौशल्य आत्मसात करा.

पहिल्या सत्रात माजी प्राचार्य डॉ. आर. बी. तेली म्हणाले, माणूस कामातून मोठा होतो. कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते. त्यामुळे मिळेल ते काम जीव ओतून करा. ज्ञानराजा चिघळीकर यांनी प्रास्ताविक केले. समीर कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. सुभाष कांबळे यांनी आभार मानले.